**जगभर**

# जनांचा प्रवाहो चालिला।

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

जगातील अनेक देशांत केंद्र सरकार निष्प्रभ झाले आहे. देशाच्या मोठ्या भूभागात निर्नायकी आहे. राजवटी स्वत:च्याच प्रजेची कत्तल करत असतील (सीरिया), धार्मिक/वांशिक/सांप्रदायिक युद्धे चालू असतील (परत सीरिया, इराक, लिबिया, ट्युनिशिया वगैरे) किंवा अतोनात गरीबी असेल (अफगाणिस्तान, सोमालिया वगैरे) त्या देशांच्या नागरिकांना तेथे जिवंत राहण्याची खात्री राहिलेली नाही. स्वत:बरोबरच मुलाबाळांचे भवितव्य भीषण दिसत आहे. या परिस्थितीत नाइलाज म्हणून लोक देशोधडीला लागतात.

जगात एकूण असे ६ कोटी विस्थापित असावेत. ते देशांतर्गत असतील किंवा देशाबाहेर गेलेले किंवा जाऊ पाहणारे निर्वासित असतील. हा लेख आज युरोपच्या दारात उभ्या असणाऱ्या व आत आलेल्या निर्वासितांवर आहे. ते अफगाणिस्तान, पाकिस्तानातून मध्य-पूर्वेतील अशांत देश व उत्तर आफ्रिकेपर्यंतच्या देशातून आले आहेत व येत आहेत. या वर्षीच युरोपात सप्टेंबरच्या मध्यापर्यंत ५ लाख अधिकृत निर्वासित आले आहेत. अधिकृत म्हणजे ज्यांची संयुक्त राष्ट्रसंघाने निर्वासित म्हणून नोंद केली आहे. अनधिकृत आकडा उपलब्ध नाही.

उत्तर आफ्रिका-मध्यपूर्वेत ही प्रचंड मानवी वाहतूक संघटितरीत्या करणाऱ्या टोळ्या आहेत. प्रवासाच्या दोन्ही टोकांना ही वाहतूक बेकायदेशीर आहे. नागरिकत्व असणारा देश व जेथे जायचे तो देश दोघांचीही प्रवासाला संमती नसते. त्यामुळे सगळा व्यवहार बेकायदेशीर असतो. तो कोणत्याही कागदावर उतरत नाही व त्याची किंमतही वाढते. साधारणत: माणशी एक ते तीन लाख रुपये घेऊन या सर्वहारांना त्यांच्या देशातून बसमधून देशाच्या किनाऱ्यावर (किनारा असला तर) किंवा बहुधा उत्तर आफ्रिकेतील निराळ्या देशाच्या किनाऱ्यावर आणण्यात येते. पहिल्या टोळीची जबाबदारी इथे संपते. मग त्यांना असुरक्षित, कमकुवत बोटींवर, तराफ्यांवर बसवून समुद्रात धाडण्यात येते. दुसऱ्या टोळीची जबाबदारी इथे संपते. यापुढे ती बोट समुद्रात उलटली काय, इच्छित ठिकाणी पोचली काय याची कंत्राटदारांना फिकीर नसते. अशा अनेक बोटी उलटून शेकड्याने माणसे मरण पावली आहेत.

पुढील भौगोलिक नोंदींवरून या प्रश्नाच्या व्याप्तीची व यातनामय प्रवासाची कल्पना यावी. अफगाणिस्तानातून युरोपला येऊ इच्छिणारा १६-१७-१८ वर्षांचा तरुण सात-आठशे रुपयांचे तिकीट काढून इराणच्या अफगाणिस्तानातील हद्दीवरच्या बसमध्ये बसतो. बस इराणमध्ये जाते. सीमेवरच्या तपासणीत त्याला गोळ्या घालून ठार मारले जाऊ शकते, परत पाठवले जाऊ शकते किंवा बहुधा तो इराणमध्येच मोलमजुरी करून आयुष्य घालवण्याची शक्यता असते. उत्तर आफ्रिकेतील मोरोक्को, अल्जीरियातून निर्वासित स्पेनला येऊ पाहतात. माली, नायजर, लिबिया,ट्युनिशिया या उत्तर आफ्रिकेतील देशांतून तसेच सुदान, येमेन या देशांतील निर्वासित अनेक देश पार करून बसेसने उत्तर आफ्रिकेतील एखाद्या बंदरापर्यंत (बहुधा लिबियातील, कारण तेथे अराजक असल्याने अशी वाहतूक अनियंत्रित आहे) येतात. तेथे गोदामात राहतात व बोटीने इटलीला येतात. इथिओपिया, सोमालिया, एरिट्रिया या पूर्व आफ्रिकेतील देशांतील निर्वासित इजिप्त मार्गे ग्रीसला जाण्याचा प्रयत्न करतात. युद्धग्रस्त सीरियातून तेथील नागरिक शेजारच्या तुर्कस्तानमध्ये येतात किंवा तुर्कस्तानमधून पुढे मॅचेडोनिया-बल्गेरिया-रोमानिया-हंगेरीमार्गे जर्मनीला जाऊ पाहतात किंवा तुर्कस्तान-ग्रीस-मॅचेडोनिया-सर्बिया-क्रोएशिया-हंगेरी मार्गे ऑस्ट्रियात येतात. इटली, ग्रीस किंवा तुर्कस्तान हे त्यांचे इच्छित अंतिम ठिकाण नसते. उत्तर आफ्रिकन्सना प्रामुख्याने फ्रान्समार्गे ब्रिटनला यायचे असते तर मध्यपूर्वेतील नागरिकांना सध्यातरी स्वागत करणाऱ्या जर्मनी, ऑस्ट्रियाला जायचे असते. काही लोकांना स्वीडन, डेन्मार्कलाही जायचे असते कारण या देशांमध्ये अन्न-वस्त्र-निवारा व काही प्रमाणात तरी उपजीविकेची संधी उपलब्ध होते, मुळात या देशांमध्ये सामाजिक सुरक्षा असते ती त्यांचा देश त्यांना देऊ शकत नाही. 'तुमच्या देशात कुत्र्याला जेवढी किंमत आहे, तेवढी आमच्या देशात माणसालाही किंमत नाही' असे हे निर्वासित सांगतात.

पुढील दोन-तीन उदाहरणांवरून या लोकांची अगतिकता लक्षात यावी. फ्रान्स-ब्रिटनला जोडणारा एक बोगदा आहे. हा समुद्राखालून आहे. त्यातून दोन्ही दिशांना रेल्वेने जाता येते. फ्रान्सच्या बाजूला या बोगद्याचे कॅले हे ठिकाण आहे. कॅलेपाशी शेकडो आफ्रिकन्स, कित्येक वर्षे उघड्यावर तात्पुरत्या तंबूत राहत आहेत. तेथे पाणी नाही, शौचालये नाहीत. स्वयंसेवी संघटना, संयुक्त राष्ट्रसंघ यांच्याकडून मिळेल तो शिधा. त्यांना फ्रान्समध्ये राहण्याची परवानगी नाही आणि ब्रिटनमध्ये प्रवेश करण्याचीही परवानगी नाही. या वस्तीला 'जंगल' म्हटले जाते. या जंगलातून

एक सुदानी माणूस बोगद्यात उतरला. बोगदा अरूंद, आधी जमिनीखालून मग समुद्राखालून जाणारा, अंधारा व फक्त रेल्वेसाठी बांधलेला. कोणत्याही क्षणी ताशी १०० मैल वेगाने येणाऱ्या रेल्वेखाली माणूस येऊ शकतो. या माणसाने चार कुंपणे पार केली, चारशे सुरक्षा कॅमेरे चुकवले, अनेक सुरक्षा पोलिसांना चुकवले आणि ३१ मैल चालत ब्रिटनमध्ये बोगद्यातून वर आला. त्याला लगेच अटक करण्यात आली. त्यासाठी रेल्वेच्या वाहतुकीला अडथळा केल्याचा १८६१ सालचा कायदा लागू करण्यात आला. हे त्याचे ब्रिटनमधील स्वागत.

२७-२८ ऑगस्टला ऑस्ट्रियात हायवेच्या बाजूला एक ट्रक उभा असलेला आढळला. तो ट्रक म्हणजे अन्नपदार्थांची वाहतूक करणारा एक मोठा फ्रीजच होता. त्याच्या ड्रायव्हरचा पत्ता नव्हता. पोलिसांनी ट्रक उघडला. त्यात काही दिवसांपासून कुजू लागलेले ७१ मृतदेह आढळले. ते विच्छिन्न होऊ लागले होते. त्यात चार लहान मुलेही होती. हवाबंद ट्रकमध्ये गुदमरून त्यांचा मृत्यू झाला होता. एक सीरियन पासपोर्टही सापडला. हे मध्यपूर्वेतील नागरिक बल्गेरिया-हंगेरीतून ऑस्ट्रियाला आले असावेत. ते मेल्याचे लक्षात आल्यावर ड्रायव्हरने ट्रक सोडून दिला. एक अफगाण, दोन बल्गेरियन्स व दोन हंगेरियन यांना या प्रकरणी अटक झाली. विशेष म्हणजे निर्वासितांच्या प्रश्नावर २८ युरोपियन राष्ट्रांच्या प्रमुखांची परिषद या घटनास्थळापासून ३० मैलांवर याचवेळी चालू होती.

रशियाचा एकेकाळचा सर्वेसर्वा स्टॅलिन. त्याचे एक विधान प्रसिद्ध आहे. लोक लाखात मेले तर ती आकडेवारी होते. एक माणूस मेला तर ती शोकांतिका होते. वरील घटना डोळ्यासमोर घडत असताना, सीरियातील हत्याकांडात आजवर गेल्या चार साडेचार वर्षांत अडीच लाख लोक बळी पडले असताना, देशाची निम्मी लोकसंख्या - सव्वा कोटी - विस्थापित झाली असताना जगाचे दुर्लक्ष चालू राहिले.

मात्र स्टॅलिनच्या विधानाची प्रचीती लगेच आली. दोन सप्टेंबरला तुर्कस्तानच्या किनाऱ्यावर एका तीन वर्षांच्या मुलाचे शव सापडले. त्याचा फोटो जगभर इंटरनेटने प्रसृत झाला. मग जगात नाही तरी युरोपच्या काही देशात तरी अस्वस्थता आली. या मुलाचा पाच वर्षांचा भाऊ आणि त्याची आई यांचेही मृतदेह सापडले. वडील जिवंत किनाऱ्याला लागले. हे कुटुंब सीरियातील युद्धग्रस्त कोबानी शहरातून आले होते व तुर्कस्तानहून एका तराफ्यावरून ग्रीसला निघाले होते. तो तराफा निघाल्यापासून पाच मिनिटांतच उलटला व इतर काही प्रवाशांबरोबरच यांनाही जलसमाधी मिळाली.

दुसऱ्या महायुद्धातला नरसंहार, तेव्हाच्या निर्वासितांचे हाल, आपल्या 'संस्कृती'ची, समृद्धीची मूल्ये ही किमान मानवी संवेदना निदान जर्मनी व ऑस्ट्रियात जागी झाली. आपण निष्क्रिय बघे राहणे अनैतिक आहे या जाणिवेने जर्मनीने काही लाख निर्वासितांना आश्रय देण्याचे धोरण जाहीर केले. मग लाजेकाजेस्तव फ्रान्स व ब्रिटनने पुढील एक-दोन वर्षांत प्रत्येकी वीस-पंचवीस हजार निर्वासित स्वीकारण्याचे मान्य केले. पण युरोपमधील इतर देशांत अजूनही ही जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दिसत नाही. इटली व ग्रीसमध्ये आताच प्रचंड प्रमाणात निर्वासित जमा झाले आहेत. त्यांचा भार त्या दोन्ही देशांना झेपण्याच्या पलीकडे आहे हेही गेली एक-दोन वर्षे स्पष्ट होत होते कारण रोजच दोन-अडीच हजार निर्वासित त्यांच्या किनाऱ्यांवर येत होते. पूर्व युरोपातील अनेक देश आधी कम्युनिस्ट होते. दुसरे महायुद्ध व त्यानंतर रशियाचा प्रभाव या काळात त्यांनी मोठ्या प्रमाणात मानवी दु:ख पाहिलेले आहे. तरी आज तेच देश निर्वासितांना स्वीकारण्यास नाखूष आहेत. जर्मनी-ऑस्ट्रियाच्या नाझी इतिहासानंतरचे त्या देशांचे पापक्षालन करण्याचे वर्तन व या पूर्व युरोपियन देशांचे इतिहास विसरण्याचे वर्तन यात लक्षणीय तफावत आहे.

किंबहुना, जर्मनी, ऑस्ट्रियात राजकीय नेतृत्व लोकमताच्या मागोमाग पण लगेच आले. जर्मनीतील म्युनिच या शहरात हंगेरीहून हजारोंनी निर्वासित रोज रेल्वेने येत असत. त्यांच्या स्वागताला स्टेशनबाहेर सामान्य माणसे 'जर्मनीत स्वागत असो' असे फलक घेऊन उभी असत. लोकांनी स्वत:हून निर्वासितांसाठी कपडे, अन्न-पाणी, लहान मुलांसाठी खेळणी गोळा केली. उद्योगधंद्यांनी काही निर्वासितांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शवली जेणेकरून उपजीविकेची संधी उपलब्ध होईल. बायर्न म्युनिच या श्रीमंत फुटबॉल क्लबने निर्वासितांच्या निधीला काही कोटी रुपयांची देणगी दिली. आपल्या वाढत्या वृद्ध लोकसंख्येला लागणारे सक्षम कामगार या दृष्टीने जर्मनी त्यांच्याकडे पाहत आहे.

याउलट सप्टेंबरच्या १६ तारखेला निर्वासितांच्या लोंढ्यांना रोखण्यासाठी हंगेरीत पोलिसांनी त्यांच्यावर जोरदार पाण्याचे फवारे मारले, अश्रुधूर सोडला, लाठीमारही केला. त्याआधी हंगेरी-सर्बिया सीमा बंद करण्यात आली. त्याआधी तर काहीशे निर्वासित हंगेरीहून ऑस्ट्रियामार्गे जर्मनीला जाऊ इच्छित होते. त्यांच्यासाठी सोडण्यात येणारी रेल्वे वाटेतच बंद करण्यात आली आणि त्यांना एका छावणीत नेण्याची योजना होती. निर्वासितांनी हंगेरीत रहायला नकार दिला व तेथेच बैठक मारली. दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रियाला चालत जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ऑस्ट्रियाच्या सीमेपर्यंतचे अंतर १०० कि.मी. होते पण जत्थेच्या जत्थे चालत निघाले. इतर युरोपीय देशांच्या दडपणाने हंगेरीने शेवटी १०० बसेस नेमून त्यातून या लोकांना ऑस्ट्रियात सोडले. तिथे त्यांचे जर्मनीसारखे स्वागत झाले. हंगेरीच्या पंतप्रधानांनी युरोपियन युनियनच्या

*(पान ३१ वर)*

***जगभर,*** *(पान ११ वरून)*

(पान ११ वरून)

परिषदेत निर्वासितांचा प्रश्न जर्मनीचा आहे, युरोपचा नाही अशी भूमिका घेतली होती. त्यानुसारच त्या देशाचे हे वर्तन आहे. आतातर देशात विनापरवाना असे येणे हा दखलपात्र गुन्हा करण्यात आला आहे. पोलिसांच्या दंडुकेशाहीने हंगेरी-सर्बियाच्या सीमेवर निर्वासित सैरावैरा धावत होते. त्यातील एक मध्यमवयीन पुरुषाला हंगेरीच्या एका अतिउजव्या आदर्शवादी टीव्ही चॅनेलच्या फोटोग्राफर स्त्रीने पायात पाय घालून जमिनीवर पाडले. तो माणूस तर पडलाच पण त्याच्या कडेवरचा तीन-चार वर्षांचा मुलगाही पडला. युरोपातील नव-नाझी शक्ती निर्वासितांकडे कशा पाहतात व पाहतील याची ही झलक जगाला दिसली (चार दिवसांत स्पेनने या इसमाला नोकरी दिली आणि त्याचे स्पेनमध्ये स्वागत केले.) हंगेरीपाठोपाठ क्रोएशिया देशानेही आपली सीमा निर्वासितांसाठी बंद केली. जर्मनीलाही यांच्या संख्येला तोंड देता येईना म्हणून त्यांनी आंतरराष्ट्रीय रेल्वे सेवा तात्पुरती बंद केली आहे.

एकूण हा प्रश्न एवढ्यावर थांबणार नाही. वर म्हटल्याप्रमाणे कित्येक लाख सीरियन्सच निर्वासित आहेत. त्यातले १५ लाख तुर्कस्तानात, १० लाख लेबॅननमध्ये, ७ लाख जॉर्डनमध्ये आहेत पण कित्येक लाख युरोपच्या मार्गावर आहेत. युरोपची एकूण लोकसंख्या ७२-७३ कोटी आहे. जर युरोपियन युनियनच्या २८ देशांनी हा भार प्रमाणशीर उचलला तर तो भार न होता, त्यांची अर्थव्यवस्था अधिक समृद्ध करणारा घटक होऊ शकतो.

त्याचबरोबर या निर्वासितांत छुपेपणाने पण नक्की येणारे कडवे मुस्लिम आंतकवादी, वाढत्या एतद्देशीय अतिउजव्या वंशद्वेषी शक्ती यामुळे वातावरण बदलणार हे निश्चित. युरोपचे 'गोऱ्यांनी गोऱ्यांसाठी चालवलेले राज्य'हे चित्र बदलायला सुरूवात झाली आहे.

एका दृष्टीने ही पश्चिमेच्या सीरिया व इतरत्रच्या निष्क्रियतेची किंमत आहे. ढवळाढवळ केली तर नरसंहार होतो हे अफगाणिस्तान-इराकमध्ये पाहिल्यावर पश्चिम (विशेषत: अमेरिका) सीरिया व इतर उत्तर आफ्रिकन देशात, सुदान, येमेनमध्ये अलिप्त राहिली. पण अलिप्त राहिले तरी नरसंहार टळत नाही हे दिसून आले आहे. निर्वासित हे व्याधीचे दृश्य रूप आहे. जागोजागच्या हिंसाचारी शक्तींना आळा घालून त्या-त्या ठिकाणी सामान्य माणसाला शांतपणे जगता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे हा व्याधीवरचा उपाय आहे. तो जगाला जमत नाही.

एका अंदाजानुसार मध्यपूर्वेतील अशांत प्रदेशात सुमारे दीड कोटी मुले गेली काही वर्षे शिक्षणाला मुकली आहेत. ही हिंसाचारात वाढणारी पिढी, हे आगामी संकट निराळेच.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*